# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


जाहिर सूचना

क्रमांक: २/एनजीसी/मान्यता/२०१९/१८५

दिनांक : 22 FEB 2019

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या मान्यता प्रक्रीयेबाबत......

संदर्भ :- या संचालनालयाने प्रसिध्द केलेली जाहिर सुचना क्रमांक २(३)/एनजीसी/ मान्यता/ २०१९/३५, दि. १५.०१.२०१९

विषयांकीत जाहिर सुचनेस अनुसरून कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून नवीन पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका (पीजीडीएम) संस्था सुरू करणे तसेच विद्यमान अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तूशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, एम.सी.ए., एच.एम.सी.टी अभ्यासक्रमाच्या पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका (पीजीडीएम) या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना सादर केलेल्या खालील प्रस्तावाच्या अनुषंगाने **संचालनालय स्तरावरुन सुनावण्या घेण्यात येणार आहेत.**

१. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून नवीन अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, एचएमसीटी व एम.सी.ए. अभ्यासक्रमांच्या पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका (पीजीडीएम) संस्था सुरू करणे.

२. विद्यमान संस्थामध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करणे / सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ.(ऐआयसीटीईच्या मानकांनुसार तुकडी पुर्ण करणारे प्रस्ताव वगळून)

३. विद्यमान संस्थेत अतिरीक्त इंडीग्रेटेड व ड्युअल डिग्री सुरू करणे.

४. विद्यमान पदवी औषधनिर्माणशास्त्र संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरू करणे व याउलट करणे

२. **सुनावणीचे वेळापत्रक खालील प्रमाणे असून संबंधित संस्थानी त्यानुसार वरील प्रस्तावांच्या सुनावणी करीता या संचालनालयाच्या समिती सभागृहात उपस्थित राहवे.**

| अ.क्र. | तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय कार्यक्षेत्र | सुनावणीचा दिनांक |
|---|---|---|
| १ | तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय **पुणे, नागपूर,व अमरावती**<br>नवीन संस्थांचे प्रस्ताव ------<br>विद्यमान संस्थाचे प्रस्ताव ------ | <br><br>दि. ०५.०३.२०१९ रोजी- सकाळी १०.३० वाजता<br>दि. ०५.०३.२०१९ रोजी- दुपारी ०२.३० वाजता |
| २ | तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय **मुंबई, नशिक व ओरंगाबाद**<br>नवीन संस्थांचे प्रस्ताव ------<br>विद्यमान संस्थाचे प्रस्ताव ------ | <br><br>दि. ०६.०३.२०१९ रोजी- सकाळी १०.३० वाजता<br>दि. ०६.०३.२०१९ रोजी- दुपारी ०२.३० वाजता |

३. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून नवीन संस्था सुरू करण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सुनावणीस येतांना संबंधित संस्थेने अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर सादर केलेल्या भाग १ व भाग २ च्या अर्जाच्या [submitted to R.O] साक्षांकीत प्रतीसह संपुर्ण प्रस्ताव (अर्जात भरलेल्या माहितीच्या पृष्टर्थ मुळ कागदपत्रांसह) , तसेच सहसंचालक, तंत्र शिक्षण,विभागीय कार्यालये यांचेकडे नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीसह संस्थेचे अध्यक्ष / सचिव किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या जबाबदार व्यक्तीनी (लेखी प्राधिकार पत्रासह) व्यक्तीश: सुनावणीस उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

४. विद्यमान पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका (पीजीडीएम) या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी उपरोक्त नमूद केल्यानुसार सुनावणीस येतांना संबंधित संस्थेने अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर सादर केलेल्या भाग १ व भाग २ च्या अर्जांच्या [submitted to R.O] साक्षांकीत प्रतीसह संपुर्ण प्रस्ताव (अर्जात भरलेल्या माहितीच्या पृष्ठ्यर्थ मुळ कागदपत्रांसह), अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचा डेफीसिअन्सी रिपोर्ट (Submitted to R.O Office), सहसंचालक, तंत्र शिक्षण,विभागीय कार्यालये यांचेकडे नोंदणी शुल्क अदा केल्याची पावती, ऑन लाईन पध्दतीने संचालनालयाच्या संकेत स्थळी माहिती भरल्यानंतर Annexure सी व डी ची साक्षांकीत प्रत, आवश्यक, भरलेल्या (University Approved, Univeristy non Approved Faculty) व रिक्त असलेल्या शिक्षकीय पदांची माहिती, संस्थेविरुध्द प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे व तक्रारीची माहिती इ. कागदपत्रासह प्राचार्यांनी व्यक्तीश: सुनावणीस उपस्थित राहणे अनिवार्य राहील. **प्रस्तावाची नस्तीची १ प्रत अनुक्रमाणिका, पृष्ठ क्रमांक व पताका लावून सुनावणीच्या वेळी संचालनालयात जमा करावी.**

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात असलेल्या संस्थाना वरील सुनावण्यांच्या वेळापत्रकाची माहिती त्यांचेस्तरावरुन कळविण्यात यावी.

२) सर्व विनाअनुदानित पदविका , पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची महाविद्यालये

३) सिस्टीम मॅनेजर, कार्यासन क्रमांक ३ (संगणक कक्ष), तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई.